पान १३ वरून...

## ॲग्रो व्हिजन : कृषी विकासाचा कृतिशील रोडमॅप

देण्यासाठी हे मॉडेल्स प्रदर्शनात ठेवण्यात येतील आणि तज्ज्ञ निवड समितीने या प्रयोगाच्या व्यावसायिक विकासासाठी मॉडेलची निवड केल्यास त्यासाठी १ लाखापर्यंत प्रोत्साहन अर्थसाह्य करण्यात येणार आहे.

या प्रदर्शनात कृषी यंत्रे, अवजारे, बियाणे, वित्तसंस्था, कृषी संशोधन, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्र, जैवऊर्जा, अपारंपरिक ऊर्जा, पॉलिहाऊस, शेडनेट, पशुधन, पशुवैद्यकीय सेवा, विमा, स्वयंसेवी संस्था, साठवणूक प्रक्रिया, विपणन, वाहतूक, खरेदी-विक्री, योजना व अनुदान आदी संदर्भातील विविध सरकारी, निमसरकारी संस्थांचे स्टॉल्स राहतील.

या प्रदर्शनात ॲग्रो व्हिजन फाऊंडेशन, एमएम ॲक्टिव्ह, पूर्ती उद्योगसमूह, वेद, एमईडीसी आदींचा सक्रिय सहभाग असून याशिवाय कुबोटा मशिनरी, फोर्स मोटर्स, सोनालिका ट्रॅक्टर्स, डॉ. बावसकर, पुष्पावना फ्लोरिस्ट, जयदीप कंट्रोल्स, अजय बायोटेक, एल्कॉम टेक्नालॉजी, प्रवीण मसाले, रक्षा पाईप्स, धानुका ॲग्रिटेक, आदित्य स्पेशालिटी, हायटेक सोल्युशन आदी संस्थांचे स्टॉल्स राहणार आहेत.

प्रदर्शनाचे संयोजन डॉ. सी. डी. मायी, डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाचे माजी अध्यक्ष नंदकुमार, माजी रेशीम संचालक डॉ. कलंत्री, अंकुर सीड्सचे एम. जी. शेंबेकर, कृषी विकास महामंडळाचे व्ही. जे. अकत, संयोजक गिरीश गांधी, रमेश मानकर, ॲग्रो व्हिजन फाऊंडेशनचे अध्यक्ष रवींद्र बोरटकर आदींनी केले आहे. पत्रपरिषदेला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी खासदार दत्ता मेघे, देवेंद्र पारेख, आ. बोंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## रवी राणांच्या वाहनावर दगडफेक

गौप्यस्फोट रवी राणा यांनी शुक्रवारी केला होता.

राणा यांची एमएच २७ बीई १ क्रमांकाची फॉर्च्युन गाडी गोंडखैरीवरून नागपूरकडे येत असताना चोकरधानी हॉटेलसमोरील अमरावती रोडवर दुचाकीवर आलेल्या दोघांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला. चालकाला आपलेच कार्यकर्ते असल्याचे वाटल्यामुळे त्याने वाहने थांबविले असता दुचाकीवरील एकाने कारवर दगड भिरकावला आणि ते पळून गेले, अशी माहिती पोलिसांनी दिली. शुक्रवारीच केलेला गौप्यस्फोट आणि शनिवारी वाहनावर झालेली दगडफेक याचा काही संबंध आहे का, याचा तपास पोलिस करीत आहेत. या दगडफेकीच्या घटनेमुळे राजकीय तणाव वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

दरम्यान, नागपूरच्या या घटनेनंतर अमरावती येथील राणा यांच्या कार्यालयाबाहेर पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आल्याची माहिती आहे.

## संदीप गवई यांना भाजपाची उमेदवारी

पंकज थोरात यांचा ३७६६ मतांनी पराभव केला होता. त्यावेळी कुंभारे यांना १३,०७३ व थोरात यांना ९,३०७ मते मिळाली होती. पंकज थोरात यांनीही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून या पोटनिवडणुकीसाठी पुन्हा एकदा आपली दावेदारी